**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर. पिन कोड नं. ४२३१०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१, २५८७७२, फॅक्सः २५८७७०.

जा.नं. एमएसएस वशी-खरेदी/3041/२०२४
दिनांक: - 3 DEC 2024

प्रति.

-------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

**विषयः- गाईचे शुद्ध तूप... कोटेशन मागणी**

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी करीता खालीलप्रमाणे **गाईचे शुध्द तूप** उत्पादकांकडून खरेदी करावयाचे आहे.

| अ.नं. | तपशिल | मागणी | ब्रॅन्डचे नांव | दर रुपये प्रती क्विंटल सर्व करासहित |
|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तूप,<br>१५ कि.ग्रॅ. नवीन डबा पॅकींग,<br>AGMARK FSSAI | ३,००० क्विंटल<br>(तीन हजार) | | |

वरील गाईचे शुद्ध तुप खरेदीसाठी खालीलप्रमाणे अटी-शर्ती लागु राहतील, याचा दरपत्रक भरताना विचार करावा.

**अटी शर्ती -**

१. गाईचे शुध्द तूपाचे उत्पादक यांनाच सदरचे दरपत्रक भरता येईल. इतर दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. सदरचे गाईचे शुद्ध तुप खरेदीचा कालावधी दोन महिन्यांचा राहिल.

३. दर भरताना श्री साईबाबा संस्थानचे शिर्डी भांडार पोहचचे वाहतूक, वाराई, तसेच G.S.T. सह सर्व कर समावेशक प्रतो क्विंटलचे प्रती दर द्यावेत, इतर कुठलीही रक्कम स्वतंत्र आदा केली जाणार नाही.

४. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला उत्पादक परवाना तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST नंबर पावती, FSSAI,AGMARK परवाना, पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रे सादर करावीत,

५. दरपत्रक भरलेले ब्रॅन्डेड गाईचे शुद्ध तुपाचा ब्रॅण्डचा स्पष्ट उल्लेख असलेला १५ किलो डबा **दि. ०३/१२ /२०२४** ते **दि.०७/१२ / २०२४** पर्यंत खरेदी विभागाचे कार्यालयात सादर करावेत.

६. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांचे दरपत्रक मंजुर होतील त्यांना पुरवठा आदेश मंजुर झालेचे कळविलेनंतर विहित मुदतीत गाईचे शुद्ध तुपाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम DD व्दारे रोखीने RTGS व्दारे सुरक्षा अनामत म्हणून भरावी लागेल, हि सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरीत्या गाईचे शुद्ध तुपाचा पुरवठा पूर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

७. दरपत्रक मंजूर झालेनंतर शिर्डी येथे समक्ष येऊन रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरीत नोटराईज्ड करारनामा करून देणे बंधनकारक राहिल. करारनाम्याची नोटरी फी संबंधित दरपत्रकधारकास आदा करावी लागेल.

८. श्री साईबाबा संस्थानकडून गाईचे शुध्द तूपाचा वापर श्रींचा लाडू प्रसाद तयार करण्यासाठी केला जातो. त्यामुळे आपण पुरविणार असलेले शुध्द तूपाचा दर्जा चांगला असावा.

९. तुपाचा पुरवठा नवीन १५ कि.ग्रॅ. चे पॅक बंद डब्यामध्येच करावा लागेल, डब्यावर मंजुर ब्रॅण्डचे नाव, शासनाचा ॲगमार्क FSSAI Lic. No., तसेच तुपाचे उत्पादन व वैधता (Manufacturing & Expiry Date) तारीख इत्यादी तपशिल असणे आवश्यक आहे. तुप ताजे (Fresh) असणे आवश्यक आहे. Expiry Date संपत आलेले तुप स्विकारले जाणार नाही

१०. शुध्द तूपाची शासकीय /NABI लॅबकडून तपासणी केली जाईल, या लॅब तपासणीचा अहवाल FSSAI AGMARK Norms प्रमाणे नसल्यास सदर शुध्द तूप बदलून दयावे लागेल. तथापि शुध्द तूप वापरले गेले तर वापरलेले तूपाचे एकुण किंमतीचे २ ते ५ % दंड पुरवठादाराकडून वसुल करण्यात येईल.

११. पुरवठा केलेल्या गाईच्या शुद्ध तुपापासून बुंदी तळताना धुर झाल्यास अगर बुंदीची कडवट चव आल्यास, बुंदी तळताना तुपात फेस आल्यास किंवा काही खराब तुप आढळल्यास, तसेच श्री साईबाबा संस्थानने केलेल्या तुपाचे सर्व तपासणीचा अहवाल Norms प्रमाणे नसल्यास सदर तुप स्वखर्चाने त्वरीत बदलुन देण्याची जबाबदारी दरपत्रकधारकावर राहिल. याबाबत पुढील निर्णय संस्थान प्रशासनाकडून घेतला जाईल व तो पुरवठाबारकावर बंधनकारक राहिल.

१२. तुप पुरविताना तुप ज्या बॅचचे असेल त्याचा विश्लेषण अहवाल (Analysis Certificate) N.A.B.L. Government Lab चा असणे आवश्यक आहे.

१३. तुपाच्या डब्यावरचे लेबल अन्न सुरक्षा (पॅकेजिंग व लेबलिंग) नियम २०११ व वैधमापनशास्त्र (पॅकेजिंग व लेबलिंग) च्या तरतुदीप्रमाणे असणे कायद्याने बंधनकारक आहे.

१४. तुप पुरविलेनंतर साधारण ३० दिवसांचे आत बील अदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी श्री साईबाबा संस्थानकडून कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

१५. दरपत्रक देताना **“ गाईचे शुध्द तुप पुरविणेचे दरपत्रक ”** असा स्पष्ट उल्लेख करावा.

१६. उशिरा आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

१७. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

१८. शिर्डी संस्थान ही धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

१९. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.

२०. उपरोक्त अटी-शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी-शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट / अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशी दरपत्रके विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२१. सदरचे दरपत्रक मागणीची अंतीम **दि.०७/१२/२०२४** पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत समक्ष जमा करावेत.

**पुरवठादाराचा सही व शिक्का**

(बाळासाहेब कोळेकर)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी